# Critical Enquiry

Volume VIII, Issue I & II, January - June 2016

ISSN 0975-0096

आंबेडकरवादी साहित्य विशेषांक

Peer-reviewed
Quarterly Research Journal
for Inter-disciplinary studies
in Humanities and Social Sciences

Critical Enquiry January - June 2016
ISSN 0975-0096 Volume VIII, Issue I & II

**Advisory Board**

M. S. Patil
Scholar and Critic, Marathi Literature, Mumbai.

N. K. Thakre
Founder Vice Chancellor, North Maharashtra University, Jalgaon.

Arun Sadhu
Renowned Journalist & Marathi Litterateur, Mumbai.

Narendra Chapalgaonkar
Rtd. High Court Judge, Aurangabad.

**Editor**

Eknath Pagar
Associate Professor,K.R.Aher Arts,Com. & Sci. College,Deola,Dist.Nashik

**Editorial Board**

Ashok Joshi
Rtd. Dean and Head, Department of English, University of Goa.

Ramesh Narayan Warkhede,
Rtd.Professor & Head, School of Humanities & Social Sciences, YCMOU, Nashik

Mangala Warkhede
Director, Institute of Knowledge Engineering, Nashik.

Sadanand More
Professor & Head, Department of Philosophy, University of Pune.

Milind Malshe
Professor of English and Aesthetics, I.I.T., Mumbai.

Ashok Babar
Principal, Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,
Kavathe Mahankal, Dist. Sangli

Mrunalini Fadanvis
Principal, Mahila Mahavidyalay, Nagpur.

Dilip Dhondge
Principal, K.T.H.M. College, Nashik

Prachi Gurjarpadhye, Mumbai

© Institute of Knowledge Engineering, Nashik.

## Institute of Knowledge Engineering

24, Cherry Hill, Pipeline Road,
Anandvalli, Nashik - 422013.
Phone : 9822982315, email: director@ikeonline.org


# Critical Enquiry

**Marathi-English bi-lingual refereed journal**

focussing on theories, methods and applications in humanities, social sciences and education

## Subscription details

| 1 Year | 5 Years | Lifetime |
| --- | --- | --- |
| ₹ 500/- | ₹ 2000/- | ₹ 7000/- |

Cheque/D.D. should be drawn in favour of
**"INSTITUTE OF KNOWLEDGE ENGINEERING"**
payable at **Nashik**

## Address for Communication


Director, Institute of Knowledge Engineering
24, Cherry Hill, Pipeline Road, Anandvalli,
Nashik - 422013.
e-mail : criticalenquiry@ikeonline.org
Phone: 9822982315



Editors of 'Critical Enquiry' are not responsible for opinions expressed in literature published by this journal.



Owner, Printer, Publisher Harshal Ramesh Warkhede, Secretary, Warkhede Shikshan Sanstha has printed this journal at Devgiri Offset, C-9, A Road, NICE Area, MIDC, Satpur, Nashik-422007 and published at 24, Cherry Hill, Pipeline Road, Anandvalli, Nashik-422013. Editor : Dr. Eknath Pagar

# आंबेडकरवादी साहित्य विशेषांक

## अनुक्रम


Editorial 5
Ashok Babar

01. Literature as Counter-Revolution - Dr. B. R. Ambedkar's Approach to Literature 9
Prachi Gurjarpadhye

02. Ambedkar as an Indian Feminist 20
Madhuri Deshmukh

03. Semiotics of Dissent in Dalit Women's Autobiographies 27
Putul Sathe

०४. आंबेडकरवादी साहित्यविचार ४२
रमेश वरखेडे

०५. कन्नड मराठीच्या संदर्भातून – आंबेडकरी साहित्य ५१
शोभा नाईक

०६. मराठी आणि कन्नडमधील आंबेडकरवादी कविता ६८
रणधीर शिंदे

०७. कन्नड रंगभूमी आणि आंबेडकर ८०
डी. एस. चौगुले

०८. कन्नड दलित आत्मकथन ८५
प्रा. चंद्रकांत पोकळे

०९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत मराठी कादंबरी ९१
विलास काळे

१०. आंबेडकरप्रणित मराठी नाटक ११५
अरुण मिरजकर

११. मराठी कथा : मूल्य आणि ऱ्हास १२६
जी. के. ऐनापुरे

# कन्नड मराठीच्या संदर्भातून - आंबेडकरी साहित्य

शोभा नाईक

कन्नड व मराठीतील आंबेडकरी साहित्य हा विषय विविध आयामांनी युक्त विषय आहे. साहित्य आणि समाज यांचा अभिन्न संबंध उकलण्याची आज वेगळी आवश्यकता नाही. समाजातील जातीय पर्यावरण ही भारताच्या प्रगतीतील सर्वात मोठी समस्या आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीय शोषणाला खीळ लावण्याचा सक्रीय प्रयत्न केला. तळागाळात ढकललेला माणूस अस्मितेने प्रेरित झाला पाहिजे म्हणजेच हा देश उभा राहू शकेल या ध्येयाने आंबेडकर प्रस्थापितांनी चालविलेल्या शोषणाविरुद्ध, अस्मितेच्या बदलाची गर्जना करतो. ही गर्जना जीवनाच्या सर्व पातळयांमध्ये नव्या जाणिवांचे तरंग निर्माण करणारी ठरली. त्याचे पडसाद अर्थातच जीवनाचे प्रतिबिंब असणाऱ्या साहित्य क्षेत्रातही उमटले. वास्तविक त्या जाणीवांतून आकारलेल्या दलित साहित्यामुळे मराठी अभिजन साहित्य थरकापले. एकूण प्रस्थापित जातीय संवेदनांच्या वलयाचा साहित्यात प्रवेश झाला. आपल्याकडे 'ऊस डोंगडोंगा परी रस नोहे डोंगा'ही संवेदना होतीच त्यामुळे हा प्रवेश तसा नवीन नव्हता पण आविष्काराचे शैलीरूप बदलले. मराठीत संत साहित्य ते दलित साहित्य अशी एक अभ्यास शाखा उपलब्ध झाली. पण आज आपण जेव्हा प्राचीन भारत आणि अर्वाचीन भारत, आधुनिक आणि उत्तराधुनिक भारत अशी वाटचाल करतो, तेव्हा 'आंबेडकरी साहित्य' ह्या संज्ञेकडे येऊन पोहोचतो. त्यामध्ये अनेक वास्तवांना आपण सामोरे जातो. त्या वाटे वस्तुस्थिती लक्षात घेता येते. सुंदर भारत निर्माण करण्याचे स्वप्न कुठे पोहोचले त्याची चिकित्सा करता येते.

आंबेडकरी साहित्य असे म्हणताच त्यात साहित्य आणि जातीय समाज वास्तव याबरोबरच, साहित्य आणि प्रबोधनाच्या परंपरा, साहित्य आणि सामाजिक स्थित्यंतरे, साहित्य आणि भारतीय अस्तित्व, साहित्य आणि वैचारिकता, साहित्य आणि व्यक्तीजीवन वास्तव, साहित्य आणि बदलती नैतिकता, साहित्य आणि जीवनमूल्ये, साहित्य आणि माणूस, साहित्य आणि भारतातील विविध भाषासंस्कृती,

प्रादेशिक भाषा पातळी आणि देशीय पातळी असे अनेक विषय एकवटून येतात.

तत्त्वज्ञानाच्या पायावाचून असलेले साहित्य आपण कधी चर्चेला घेत नाही. आंबेडकरी साहित्य ही संज्ञा आकारतेय, याचा अर्थ आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या अस्तित्वाचा त्याच्याशी संबंध पोहोचतो. आंबेडकरी तत्वज्ञान हे सामाजिकतेचे तत्वज्ञान आहे. आंबेडकर बुद्ध धर्म स्वीकारून तत्वज्ञानास धर्माचाही स्पर्श देतात. कन्नडमध्ये बसवेश्वर यांनी आपल्या अर्थकेंद्री सामाजिक समतेच्या तत्वज्ञानाला आत्मशुद्धी, निःशब्दता असे गहन विषय चिंतणाऱ्या अल्लमप्रभुंचा स्पर्श देऊ पाहिला होता तो भारतीय समाजकारण लक्षात घतल्यामुळेच. आंबेडकरांचा समाजाला आकार देण्याचा प्रयत्न व्यवस्थित समजून घेतानाही म्हणूनच, भारतीय वाटचालीत सर्वप्रथम सामाजिकतेचा धर्म जिथून आला त्या जागांशी म्हणजेच बुद्ध आणि बसवेश्वर यांची अस्तित्वे दृष्टीपुढे अपोआप येतात. आंबेडकर बुद्ध धर्म स्वीकारतात म्हणजे काय करतात तर ते त्यामधील वैचारिकता स्वीकारतात पण कर्मकांडे नाकारतात. बसवेश्वरसुद्धा वैदिक धर्म दूर सारतात तेव्हा ती कर्मकांडांची जोखडे दूर करतात. नवा धर्म आणतानाही कर्मकांडाना ते स्थान देत नाहीत. प्राचीन गोष्टींपैकी आपल्या काळाशीं अन्वय साधताना त्यातील कोणत्या सोडाव्यात आणि कोणत्या स्वीकाराव्यात, आपल्या निकडींप्रमाणे त्या वळवून घ्याव्यात हे आंबेडकर यांना किती चपखल कळलेले होते याची प्रचिती संविधानावरून येतेच. भारतीय परंपरा, भारतीय धर्म, भारतीय जीवनक्रम यांची अचूक चौकट ते टिपतात. त्यातील हिंदू बुद्ध, जैन तत्त्वज्ञानाचा समन्वय आपण लक्षात घेणे आवश्यक ठरेल. खुद्द बुद्ध जैन तत्वज्ञानातील अहिंसा ह्या तत्वाकडे आकर्षित झाला होता. या सर्व समन्वयासह आंबेडकर सेक्युलर राहत एका सुंदर समाजाचे चित्र पाहतात. भेदभावातीत समाज ते संकल्पित करतात. सर्व प्रकारचे भेद नाहीसे होऊन प्रत्येक व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास साधण्याची संधी मिळावी हे त्यांचे स्वप्न होते. शिक्षण, आर्थिक स्वास्थ्य आणि सामाजिक प्रतिष्ठा ह्या तीन गोष्टी शोषितांना देऊ केल्या तर ते स्वतःच उठतील आणि समान दर्जा प्राप्त करतील हाच त्यांचा आदर्शवाद होता. पण तथाकथित राजकारणामुळे हे घटक प्रत्यक्षात उतरणे कठीण होते.

आंबेडकरी साहित्य आणि दलित साहित्य यात अस्तित्वात असणारा फरक लक्षात घेता आला पाहिजे. तो फरक अधोरेखित करायचा तर आंबेडकरी साहित्य हे प्रशिक्षणाचे व्यासपीठ तर दलित साहित्य त्या मुशीतून बाहेर आलेला एक आविष्कार असे म्हणावे लागेल. शोषितांना स्वतःचा आवाज मिळवून देणारे आंबेडकर या दृष्टीतून फार मोठे योगदान देतात. अस्मिता जागी करून हजारो वर्षांच्या गुलामगिरीतून

समाजाला मुक्त करणारा हा प्रेषित खरा महनीय म्हणावा लागल. त्यांच्या प्रेरणेतून भारतीय सम:जातील प्रत्येक शोषित घटकास आपला आवाज शोधता आला. भारतीय समाजात दलित, गरीब कामगार, स्त्री चळवळी अस्तित्वे मजबूत झाली.

***

आंबेडकरी साहित्याचा विचार करताना मुळात आंबेडकरी साहित्य ही संज्ञा स्पष्ट व्हावी. त्यासाठी आपल्याला सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही व्यक्तिरेखा व त्यांनी प्राप्त केलेली जीवनदृष्टी सक्षमपणे उलगडता येणे आवश्यक आहे. भारतासारख्या जातीय शोषण आकारलेल्या सामाजिक बंधनांनी ग्रासलेल्या देशात आंबेडकर ती सर्व बंधने ओलांडून संपूर्ण भारतीयांच्या आदराला कसे पात्र ठरतात हे वास्तवही आपण समजून घेतले पाहिजे. तात्पर्य, आंबेडकरी साहित्य या संज्ञेत एका वेळेस अनेकविध घटक एकवटलेले आढळतील. त्या सर्व घटकांना स्पर्श करण्यापूर्वी भारतामध्ये राजकीय स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घटनेमुळे जीवनानुभूती कशा बदलल्या ते प्रामुख्याने पाहावे लागेल. स्वातंत्र्य, जातीपलीकडे जाऊन माणसाचा विचार करणारा समाज आणि समानता - Freedom, Secularism and Equality या आधुनिक मूल्यांचा नीटपणे विचार करावा लागेल. त्याचबरोबर भारतीय समाजात जगत असलेल्या अनेकविध जातीपातीत विखुरलेल्या माणसांमध्ये ही नवी दृष्टी काही अनुबंध निर्माण करते का त्याचाही विचार साहित्याला धरून सयुक्तिक होईल.

स्वातंत्र्य, जातीविहीन समाज (श्रेष्ठ-कनिष्ठ पातळ्यांनी ग्रासलेली सामाजिकता दूर व्हावी या उद्देशाने), समता या स्वतंत्र भारत आकारताना पुढे ठेवल्या गेलेल्या आंबेडकरी संकल्पनांचा भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळातील अमानुष सरंजामशाहीच्या पार्श्वभूमीवर विचार करण्याचे भान आपल्याला हवे. आंबेडकर आपली भूमिका प्राचीन भारतातील प्रस्थापितांविरुद्ध उभे राहणाऱ्या भारतभूमीतून उगवून वर आलेल्या बुद्धांसारख्या भूमिपुत्रांकडून मिळवितात. त्यामुळे ते अपोआप भारतीय पातळीवर जाते. आंबेडकरी विचारव्यवस्था समजून घेताना कन्नडमधील बसवेश्वरी धारा तर खरी मदत करते. मनुस्मृतीपासून भारतात वर्ण स्थित्यंतरे पूर्णतः थांबवली गेली होती. त्यातून पुढे वर्ण पातळी टणक झाली आणि वर्णभेदही कट्टर बनत गेले. पण आता आधुनिक काळात आंबेडकरांच्या अस्तित्वामुळे जातीय वर्णीय बंधने उठवली गेली. शिक्षण आणि आर्थिक पातळीच्या सहाय्याने व्यक्ती, स्वातंत्र्य अस्तित्वात आणू शकेल, ते उपभोगू शकेल याच्या शक्यता निर्माण केल्या गेल्या. आंबेडकरी साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध व्हायला हवे. पण आपल्याकडील रूढ पारंपरिक सत्तांध अर्थकेंद्री व्यवस्थापनामुळे, जातीय उतरंडीच्या राजकीय उपयोजनामुळे

आंबेडकरी विचारही गुंडाळला जाण्याच्या शक्यताच जास्त. प्रस्थापित व्यवस्थेच्या पकडी अजूनही मजबूत आहेत. म्हणूनच आंबेडकरांच्या Secularism and Equality, Equality and Justice ह्या संज्ञा समजून उमजून पुढे संक्रमित झाल्या पाहिजेत.

Secularism and Equality या दोन्हीत असलेला फरक लक्षात घेऊ. Secularism हे तत्वज्ञान आहे तर Equality हा सामाजिक न्याय आहे. जात न पाहता आर्थिक, सामाजिक, धार्मिक या सर्व बंधनातून बाहेर आलेला माणूस हा Secular असू शकतो. Secularism ची कल्पना आपल्या परंपरेतील भक्ती संप्रदायामध्ये आहेच. Equality म्हणजे समतावाद. समतावाद म्हणजे व्यक्तीला योग्य असे स्थानमान समाजात असणे. आर्थिक पातळीवर कोणत्याच लोकशाहीत समानता असू शकणार नाही. पण न्याय प्रक्रियेत समानता आणली हे महत्वाचे. समाजरचनेत समानतेचा हा भाग आणणे फार अवघड होते, व्यक्ती स्वतंत्र असेल तिथे 'समानता' कशी हा प्रश्न उपस्थित करतात. शेतकरी २४ तास काम करतो आणि कामगार ८ तास काम करतो. दोघांना समान पध्दती उपलब्ध होऊ शकतील का? तर या प्रकारचे कार्य वृत्तीचे तारतम्य हा न्यायाचा भाग आहे. मग क्षमतेनुसार योग्य मोबदला मिळणे ही समानता. समाजात आर्थिक स्तर असणारच. पण आर्थिक स्तर स्थित्यंतरे समाजात असणे आवश्यक. प्रत्येक व्यक्तीला अन्न, निवारा आणि कामातील समान संधी मिळाली पाहिजे. माणूस कोणत्याही जातीचा असला तरी त्याच्याकडे जर पात्रता असेल तर त्याची नेमणूक मोठ्या जागेवर होईल. तो कलेक्टरपदी विराजमान होईल. देशाकडून मिळणारे हक्क सर्वांना उपलब्ध झालेच पाहिजेत. कार्यवृत्तीनुसार स्थान, मान आणि समाज प्रतिष्ठा मिळालीच पाहिजे. पण घटनेत स्थान मिळाले तरी समाजप्रतिष्ठा समाजाकडून मिळाली पाहिजे. जातीभेद निपटण्याबरोबरच लिंगभेद हेही आपले लक्ष्य असणे आवश्यक आहे. तर इथे यासाठीच साहित्याचे अस्तित्व पुढे येईल. साहित्याने पारंपरिक राजकारणी, व्यूह आणि तात्विकता, मूल्याधिष्ठित संकल्पना यातील तारतम्य ओळखणारा माणूस अधोरेखित केला पाहिजे. या संदर्भातून पाहता आंबेडकरांचे बौद्ध धर्माकडे वळणे वैशिष्ट्यपूर्ण वाटते. धर्म, कार्यवृत्ती, वर्ण यांचा समाजप्रतिष्ठेशी तर संबंध पोहोचतोच पण त्याचबरोबर वर्णस्थित्यंतर व स्वातंत्र्य यांमधील परस्पर संबंधही यातून स्पष्ट करून पाहता येतात. वर्ण स्थित्यंतर ही प्राचीन भारतात सहज शक्य अशी गोष्ट होती. (गायत्रीमंत्र देणारे ब्राह्मणगुरु विश्वामित्र यांचे मूळ क्षत्रिय वर्णात आहे.) त्याशिवाय आंबेडकर तळागाळातील स्त्रियांमध्ये स्वाभिमान अस्मिता निर्माण करण्याचे प्रयत्न

महत्वाचे हे तर सांगतातच. कोणतीही गुलामगिरी नको, त्याजागी स्वाभिमान हवा हा त्यांचा आग्रह होता.

जगात सरंजामशाही काळात समाजात स्तरभेद फार भयानक होते. प्राचीन भारतही विषम समाज प्रस्तुत करतो. वैचारिकतेतून हे भेदभाव आले नाहीत तर काही लोकांनी लाभ उठवले, त्यातून हे भेदभाव आले. आंबेडकरांनी त्यातून बाहेर पडण्यासाठी लोकांना दोन आघाड्या दिल्या. एक शिक्षणाची आघाडी आणि दुसरी आर्थिक आघाडी. राजाच्या धोरणामुळे मोठ्या समाजातून आर्थिक, सामाजिक, राजकीयदृष्ट्या कमजोर असणारे लोक बाहेर ढकलेले गेले होते. पुढे त्यांना दलित म्हटले गेले. वर्णाश्रम पद्धतीत तात्विक अर्थ नाही आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेही अर्थ नाही पण सामाजिक दृष्ट्या त्याला अर्थ आला. त्याला धर्माचे रंग दिले गेले. 'चातुर्वर्ण्य मया सृष्टं, गुण कर्म विभागशः' असे श्रीकृष्ण म्हणतो. त्यानंतर गुणकर्मानुसार जातीप्रथेला मान्यता दिली गेली. पण ही मान्यता कितपत समर्थनीय आहे याची चिकित्सा बुद्ध, महावीर यांनी सुरु केली. त्यांची धारा बसवेश्वर, चक्रधर, तुकाराम, कबीर या रूपात प्रवाहित झाली. तिचा नीट मागोवा घेऊन डॉ. आंबेडकर यांनी अत्यंत कौशल्यपूर्वक स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांचा पायंडा मजबूतीने घातला.

प्राचीन काळापासून चालत आलेल्या भारताने विविध राजांच्या सत्तांचे अनुभव घेतले आहेत. राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक पातळ्यांचे सरंजामशाहीने प्रस्तुत केलेले अनुभव घेतले आहेत. पण ती क्लेशकारक, भयप्रद, अमानुष वाटचाल सुरु असतानाच माणूसपणाचा धर्म साक्षात करणारी, कोणत्याही प्रकारचे सामाजिक शोषण नाकारून व्यापक तत्वज्ञान देणारी चार्वाक, बुद्ध ते कबीर अशी अस्तित्वे ह्या भूमीवर निर्माण झाली. म्हणजे शोषण व्यवस्था आणि तिचा सामना कसा करायचा ते शिकविणारी महनीय सामर्थ्ये यांच्या सहवासातून पुढे येत आज आपण आधुनिक जगाच्या नव्या व्यक्तिकेंद्री माणूसकेन्द्री शोषण विरहित लक्ष्याच्या पाठबळावर प्राप्त झालेल्या लोकशाहीत नांदत असलेल्या दिवसांमध्ये आहोत.

आंबेडकरी साहित्य असे संबोधताच आपल्या लोकशाहीचे संकल्प दृष्टीसमोर येतात. प्राचीन काळात होत्या त्या राजेशाही, धर्मशाही यांच्या नावाखाली चालणाऱ्या शोषण व्यवस्था राजकीय सामाजिक सांस्कृतिक पातळीवरून बाजूला सारून आज आपण आपल्या राज्यघटनेने प्रस्तुत केलेल्या व्यवस्थापनानुसार मार्गक्रमण करत आहोत. या व्यवस्थेत बुद्धिप्रामाण्य, तार्किकता, वैज्ञानिक दृष्टीकोन, समान संधीची उपलब्धी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सर्व प्रकारच्या भेदाभेदाना तिलांजली हे लक्ष्य आहे. ही नवी व्यवस्था देणारी आंबेडकरांचा सिंहाचा वाटा असणारी राज्यघटना

आपल्याला आपले हक्क आणि कर्तव्ये जबाबदाऱ्या सांगते. एक नागरी संस्कृती निर्माण करू पाहते. त्या माध्यमातून माणसाचे चारित्र्य निर्माण करू पाहते. घटनेनुसार आकारणाऱ्या जीवनात आपण कालक्रमण करत आहोत. जुने दिवस आणि हे राज्यघटनेपासून सुरु झालेले दिवस यात दिसणारा महत्वपूर्ण बदल जर साहित्याकरवी टिपला जात असेल किंवा तो अपेक्षित बदल साहित्य चित्रित करत असेल तर त्या साहित्याला आपण आंबेडकरी साहित्य म्हणू शकू.

भारतात २/३ समाज तळागाळात ढकललेला. १/३ लोक ह्या मोठ्या समाजावर राज्य करत आले. स्वातंत्र्योत्तर वाटचालीत बदल झाले. आरक्षणाच्या व्यवस्थेत काही तळागाळातून येणारे लोक राज्य आणि देश पातळीवर निवडून जातात, काहीजण तर गेली ५० वर्षे सातत्याने निवडून जात आहेत पण त्यांची आर्थिकदृष्ट्या सुधारणा झाली असली तरी समाजाची मानसिकता बदलली आहे का? हा खरा प्रश्न पडतो. शिवाय ही मानसिकता नेमकी आहे तरी कशी? या प्रश्नाचा मागोवा घ्यायला नको का?

घटनेत धार्मिक स्वातंत्र्य दिले गेले आहे. सगळी देवळे मुक्त झाली. पण तरीही पीडित समाजाची मानसिकता बदलली असे म्हणता येत नाही. बंदी उठवली तरीही प्रज्ञा बदलली का? बदलली असे म्हणता येत नाही. इंदिरा गांधी यांनाही ओरिसामधील सूर्यमंदिरात प्रवेश मिळाला नव्हता. आंतरधर्मीय विवाह हे त्यामागचे कारण होते. ही मंदिर संस्कृती व्यक्ती आणि समाज मनावर दृढ ठसा उमटवून असते.

डॉ. आंबेडकर भारताची राज्यघटना देतात. त्यांच्यामुळे त्यामध्ये ऐहिकतेची तत्वे प्रमुख झाली. जातीविहीन समाजाची संकल्पना केंद्रवर्ती आली. देशातील गरीब माणसाला त्याच्या अन्न, वस्त्र, निवारा ह्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजे. कामाची समान संधी देऊन तारतम्य राखले पाहिजे. हा प्रकार न्यायाचाच प्रकार आहे. आपल्याकडे हजारो वर्षापासून वर्णाश्रम पद्धतीची परिकल्पना होती. कुठल्याही मानवी समाजात विविध स्तर, वर्ग अस्तित्वात असतातच. भारतीय समाजात जशी वर्णाश्रम पद्धती व त्यातून पुढे जाती रूढ झाल्या तसे शिया सुन्नी असे भेद आहेतच. एकूण भेदात्मकता अस्तित्वात आणणे ही प्रवृत्ती सगळीकडेच आढळते. शोषक-शोषित संबंध एकूणच सर्व समाजात आढळतात. कालानुक्रमे सत्ताधीश होत गेलेल्या वर्गाने आपल्या स्वार्थाखातर गुलामगिरीची मानसिकता शोषित वर्गात निर्माण केलेली असते. 'आहे रे' आणि 'नाही रे' असे वर्ग निर्माण होऊन त्यामध्ये मोठी दरी निर्माण होते. पण राज्यघटनेच्या माध्यमातून कोणत्याही जातीच्या माणसाला देशाकडून हक्क मिळतात, गौरव मिळतो. नागरिकत्वाचा समान दर्जा मिळतो. शिक्षणाची समान संधी

प्राप्त होते.

प्राचीन भारतात सरंजामशाही राजेशाही काळात जातीय शोषण वर्गीय शोषण दृढ झाले होते. पण ब्रिटिशांपासून देश स्वतंत्र झाल्यानंतर देशासाठी एक समानतेच्या तत्त्वावरील राज्यघटना हवी, असे ठरले. समाजात पिचून गेलेल्या दलितांना, शोषितांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करणारी प्रस्थापित व्यवस्था बदलून जाईल अशी घटना आंबेडकरं प्रस्तुत करतात. समानतेचा घोषवारा अस्तित्वात येतो. वास्तविक देवळात प्रवेश नसणे, ही गोष्ट फार महत्वाची नव्हे त्यापेक्षा माणसांना खाण्यापिण्याचे प्रश्न सुटणे महत्वाचे. कन्नड साहित्यात केंद्रवर्ती यांनीही दगडाचे देव, मूर्तीचे मोह यातून मुक्ती सांगितली होती, अहिंसा निदर्शित केली होती. पण ही प्राचीन बंडखोरांची परंपरा आणि आंबेडकर यांच्या कृतीत देवळांबाबत काही कारणाने फरक झाला. येथे आंबेडकर फक्त समानता हा मुद्दा विचारात घेतात. बसवेश्वर देवापेक्षाही आर्थिक सबलतेचा धर्म निर्माण करण्याची प्रेरणा देतात. मार्क्सचा अर्थकेन्द्री विचार ह्याला धरून आहे. आंबेडकरांनीही आर्थिक सबलता प्राप्त करण्यासाठीच शिक्षणाची आघाडी जिंकण्याचा आग्रह दुर्बल घटकापुढे ठेवला. समानतेचा मुद्दा उचलताना धार्मिक सुधारणांचा विचारही पुढे आला.

समाजात रूढ असलेल्या धार्मिक संकल्पना घटनेत प्रवेश करू शकत नाहीत. पण त्या समाजातून बाजूलाही होऊ शकत नाहीत. ओडीसा सूर्यमंदिरात इंदिरा गांधी यांना प्रवेश नाकारला जाणे यासारख्या घटनांमधून भारतीय समाजातील प्रस्थापित वर्चस्ववादाचे स्वरूप हाती येते. पण यांची नेमकी चित्रे साहित्यात रेखाटली जाताहेत का हा प्रश्न समोर घ्यायला हवा. पारंपरिक राजेशाहीला मजबुती आणण्याकरिता, त्यांचा संपत्ती संचय सुरक्षित ठेवण्याकरिता मंदिरे होती. ज्यांच्याकडे केवळ पराकोटीचे दारिद्रय होते त्या वर्गांना मंदिर प्रवेश नाकारला गेला. एक राज्यकर्ता वर्ग, त्यांच्यासाठी क्षात्रधर्म जोपासणारा क्षत्रिय वर्ग, आणि देवळे म्हणजेच राज्यांच्या बँका सांभाळण्याचे काम करणारा, वेळप्रसंगी राजेशाहीवरही आपला वरचष्मा ठेवणारा पुरोहित वर्ग यांच्या जोखडातून सुटण्यासाठी आंबेडकरी दृष्टी कार्यरत झाली. चार्वाक ते बसवेश्वर या दरम्यान धार्मिक पातळी व त्या पातळीचे संकेत अस्तित्वात आले होते. आर्थिक ते धार्मिक आणि धार्मिक ते राजकीय असा प्रवास समाजाने कसा केला हा प्रश्न पडला की त्याचे उत्तरही कळते. (केरळच्या पद्मनाभ मंदिरातील संपत्ती.) (१७ वेळा लुटलं गेलेलं सोमनाथ मंदिर)

भारतीय साहित्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एकमेकातील पेड वेगळे काढता येत नाहीत. साहित्य आणि समाज संस्कृती यांचे परस्पर संबंध ओंजळीत

घेतले की हे म्हणणे अधिक स्पष्ट होईल. समाजातील, व्यक्तीजीवनातील घुसमटीतून साहित्य अस्तित्वात येत असते. समाजाला, व्यक्तीला शोषणातून, दडपशाहीतून सोडविण्यासाठीच साहित्याचे स्पंदन सुरू असते. साहित्य समाजाला मोकळ्या श्वासाची ग्वाही देत असते. जे आहे त्यामधील त्रुटीचा निर्देश करत एका सुंदर समाजाच्या निर्मितीचे स्वप्न ते पाहत असते. आहे रे आणि नाही रे या विषमतेतून निर्माण केल्या गेलेल्या वर्गीय पातळ्यांचा सामना निर्माण करून त्या वाटे एक प्रबुद्ध जाणीवकक्ष अस्तित्वात आणण्याकरिता धडपड करते. या दृष्टीकोनातून पाहिले तर तरी दोन्ही घटकांच्या ध्येय धोरणात फरक दिसणार नाही. डॉ. आंबेडकर ज्याच्यासाठी आयुष्यभर तळमळले तशीच तळमळ कन्नड आणि मराठी साहित्यातील बंडखोर प्रवाह (ज्यांना आज आपण secular लेखकांचे साहित्य म्हणू) करत आले. अर्थात साहित्यात जे नेहमी दोन प्रवाह राहिले आहेत त्यामधील रंजनवादी, चंगळवादी तथाकथित कलावादी प्रवाहातील साहित्य इथे आपण पूर्णपणे बाजूला ठेवत आहोत. आपण विचारात घेणार ते फक्त समाज या वस्तूचे, व्यवस्थेतून निर्माण झालेल्या शोषणाचे अस्तित्व अत्यंत गांभीर्याने आपल्या आत घेणारे साहित्य.

***

मानवाचे अस्तित्व, सुरक्षितता, सुखसमृद्धी, निकडीच्या कालिक व सार्वकालिक गरजा या संदर्भातून डॉ. आंबेडकर यांची ज्ञानसाधना अमूल्य आहे. डॉ. आंबेडकर हे आधुनिक काळात निर्माण झालेले अस्तित्व त्यामुळे त्यांच्या मागे असलेली आधुनिक काळातील जागतिक पातळीवरील शोषण व्यवस्थांबाबतच्या जागरण आणि कृतीमोहीमांची वैशिष्टे तर आपण लक्षात घेतोच पण त्याचबरोबर डॉ. आंबेडकर ज्या भारतीय समाजसंस्कृतीत उभे राहतात त्या परंपरेत त्यांचे समानधर्मा असे श्वास कोणकोणते त्यांचाही मागोवा घेणे क्रमप्राप्त आहे. हा मागोवा घेण्यातून डॉ. आंबेडकर यांची समाजभूमितील दृढता अधिकाधिक खोल जाईल. त्यांचे समाजनिर्मित पारंपरिक सीमावलय भेदून केवळ आपल्या बळावर, आपला विस्तार साधून, एकूण मानवी कुळाशी आपल्याला जोडून घेऊन आपला व्यापक अवकाश प्राप्त करणे हे वैशिष्ट्य किती महत्वाचे आहे त्याची कल्पना करता येईल. त्याचबरोबर डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले वेदनेचे विद्रोहाचे साहित्यही आपण व्यवस्थित आपल्या ओंजळीत घेऊ शकू आणि त्या साहित्यापुढचे पल्ले व त्याचे निरंतर आकाश प्रसन्नतेच्या वाऱ्याने गंधित झालेले पाहू शकू.

शोषणाचे उच्चाटन या संदर्भातून आधुनिक काळाने भारताला महात्मा जोतीराव फुले, तर्कशुद्ध बुद्धिप्रामाण्यवादी तत्वज्ञ विवेकानंद (rationalist) , शाहू महाराज,

सयाजीराव गायकवाड, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही महनीय अस्तित्वे बहाल केली. प्राचीन काळाकडून प्राप्त झालेली गौतम बुद्ध, महावीर, बसवेश्वर, अक्क महादेवी, चक्रधर, तुकाराम, कबीर ही प्रस्थापित विषमतेतून निर्माण होणाऱ्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक सत्ताकेंद्राना हलवून टाकणारी सामर्थ्ये. आजकाल निर्माण झालेले पर्यावरण पाहता उपरोल्लेखित महान समाजधुरिणांनी निर्देशित केलेल्या विचारांची एकत्रित गुंफण करण्याची निकड आपल्यासमोर उभी आहे.

'आपण भारतीय' अशी आपल्या राज्यघटनेची सुरुवात करून देणाऱ्या डॉ. आंबेडकरांचा विचार करताना मनात ही व्यापकता निर्माण होणे त्यांच्या प्रकांड व्यक्तिमत्वाला धरूनच आहे. भारतीय हे अस्तित्वच मुळी एका वेळेस परंपरा आणि नवतेच्या संवादाचा दीप जागविणाऱ्या प्रकाशाचे द्योतक आहे. भारतीय समाजाच्या शोषण परंपरा पाहता आंबेडकरी विचाराला secular ही भूमी निर्माण करण्याची सुधारणा निकडीची का झाली त्याची कल्पना येते.

कन्नड साहित्यामध्ये के. व्ही. पुट्टप्पा, शिवराम कारंथ, पी. लंकेश, अनंत मूर्ती, देवनूर महादेव, कुम. वीरभद्रप्पा, एच.नागवेणी, कवी सिद्धलिंगय्या, कवी इंदुधर होन्नापूर इ. अनेक नावे समोर येतात. ज्यांनी तळागाळातील पिचलेल्या समाजाच्या वेदनेची नस लक्षात घेतली आहे. त्यातून प्रगतीशील, आधुनिक, दलित, बंडाय हे टप्पे पुढे आहेत.

कन्नड साहित्यक्षेत्रात स्वातंत्र्योत्तर भारताची स्पंदने अधोरेखित करताना पूर्वापार चालत आलेल्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक वास्तवाचा उभा आडवा छेद घेण्याचा प्रयत्न झाला. शोषणाची उतरंड दाखवणारे पी. लंकेश 'रोट्टी' सारख्या कृतीतून घर आणि घराबाहेरील अवकाश, रस्ता, रेल्वेस्टेशन अशा सार्वजनिक ठिकाणी काय घडत आहे त्याची सामर्थ्याने चित्रे रेखाटतात. कन्नड साहित्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडून प्राप्त केलेले विद्रोही आवाजाचे अस्तित्व म्हणा अथवा आसक्ती म्हणा गेल्या ३० वर्षातील आहे. पण आंबेडकर सुरू करतात तशी बंडखोरीची बसवेश्वरप्रणीत चळवळ तर इथे आठशे वर्षापासूनच आहे. त्यावाटे प्रस्थापित यज्ञ संस्कृती रूढ वैदिकांची मंदिर संस्कृती नाकारणारी बसवेश्वरांची लिंगैक्य धारणा कन्नड भाषा साहित्य संस्कृतीच्या वाटचालीमध्ये खोलवर रूजली आहे. आंबेडकरांच्या काळाने जसे सर्व जाती धर्म यांना secularism ची दिशा दाखवली त्याचप्रमाणे बसवेश्वरांनी अनेक जातीत विखुरलेल्या समाजांना समान प्रतिष्ठेचा एक चेहरा, एक आत्मा देण्याचे पाऊल उचलले होते. त्या काळात जे शोषण सुरू होते

त्याला रोख आणण्याचीच ती कृती होती. त्याच धर्तीवर आधुनिक काळात मार्क्स प्रणीत धारेत कन्नडमध्ये प्रगतीशील साहित्य अस्तित्वात आले. बसवराज, कट्टीमनी, निरंजन यांसारख्या लेखकांनी समाजातील विविध शोषणावर समर्थ कथानके रचून ही मुहूर्तमेढ ताकदीने रोवली. चिरस्मरणे या कादंबरीत निरंजन कैयूरू नावाचे गाव रेखाटतात. शेतकऱ्यांचे आंदोलन ते पुढ्यात घेतात. पाठोपाठ कुवेंपू यांनी धर्मग्रंथाची चिकित्सा करून योग्य तीच मानवकेंद्री तत्वे प्राप्त करण्याची दृष्टी प्रस्तुत केली. त्यांच्या मलेयगळल्ली मदुमगळू, कानुरु सुब्बम्मा हेगडती या कादंबऱ्या प्रकर्षाने आठवतात. मलेयगळल्ली मध्ये त्यांनी एक गुत्ती नावाचा दलित माणूस चित्रित केला. कुत्रा, तो स्वतः आणि त्याचा मालक असा जगण्याचा परीघ दलित संवेदनेच्या संदर्भातून माणूस व प्राणी यांचा संबंध उलगडून दिला. कानुरु सुब्बम्मा हेगडतीमध्ये प्रस्तुत सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय पर्यावरणात पुरुष व स्त्री या लिंग पातळ्यांना मिळालेला पुरुषप्रधान अर्थ व सत्ताकेंद्री आकार कशी रूपे धारण करतो त्याचे उद्बोधक चित्र साकारते. त्यांचे वैचारिक साहित्य नव्या काळाची प्रकृती कशी असावी त्याचे विवेचन करते. त्यामधूनही भारत भूमीचे प्रजासत्ताक रूप निदर्शित होते. शिवराम कारंथांच्या चोमन दुडी मधून शेतीचा मालक होऊ इच्छिणारा दलित चोमा रेखाटला गेला. कवी बसवलिंगय्या यांची भुसा ही संज्ञा अवतरली. म्हैसूर येथे बंडखोर विज्ञाननिष्ठ पुरोहितशाही विरोधी लेखकांची संघटना अस्तित्वात आली. त्याच्या उद्घाटनाचे कुवेंपू यांनी केलेले भाषण आंबेडकरांनी दिलेल्या स्वच्छ मोकळ्या समाजाच्या कल्पनेची आठवण देते. अनंत मूर्ती प्रस्थापित समाजाने कसे कुठे व का बदलले पाहिजे याचे प्रभावी चित्र देतात. देवनूर महादेव यांच्या ओडूलाळ आणि कुसुमबाला या ललितकृती अत्यंत महत्वपूर्ण आहेत. आक्रोशपूर्ण आवाजासाठी प्रसिद्ध कवी सिद्धलिंगय्या यांनी शोषित आणि शोषक या भारतीय समाजातील घटकांविषयी असणारी वस्तुस्थिती दाखवताना जे म्हटले त्या प्रकाशात देवनूर यांच्या साहित्यकृती पाहिल्या की त्या अधिक स्पष्ट होतात. सत्ताधाऱ्यांनी तळागाळातील समाजांवर गुन्हेगारी लादली आणि त्या आधारे कायदेही केले. साकव्वाच्या मुलाने शेतातील भुईमुगाच्या शेंगा चोरून आणल्या आणि मध्यरात्री ते कुटुंब भुकेला शेंगा खायला बसते. पोलीस धाड घालतात. पण त्यांच्या घरी शेंगेचे साधे टरफलही हाती लागत नाही. उलट दुसऱ्या दिवशी साकव्वा आपल्या कोंबड्याच्या जोडीतला एक कोंबडा कोणी चोरून नेला ही तक्रार पोलिसात करते. संपूर्ण कथेत चोरीला गेलेल्या कोंबड्याचा शोध आणि शेवटी घरी असलेल्या त्या दुसऱ्या कोंबड्याला पकडून पोलीस स्टेशनवर हजर करण्यासाठी उडालेली धडपड लेखक चित्रित करतो.

प्रतिकात्मकरित्या हे कथानक शोषण व्यवस्थेतील समाज वास्तव समोर ठेवते.

इंदुधर होन्नापूर यांच्या कवितेने, कापून घेतले शरीराचे मांस माझ्या भाऊ बहिणींच्या / तोडून हाडे माझ्या आईबापाची खरपूस परतली / गरम रक्ताची बियर बनवली / नसा छिलून त्याचीच वस्त्रे बनवली बिन्नीची / हे अधोरेखित केले. शोषितांच्या जीवावर शोषक आपली मौज करतात ह्या जाणिवा साहित्याकरवी प्रसारित झाल्या.

एच. नागवेणी यांची गांधी बंदा ही कादंबरी भारतीय समाजात रूढ धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक पातळयांचे अचूक वास्तव रेखाटते. मराठीतील दलित लेखकांप्रमाणे कन्नडमध्येही वेदना आणि विद्रोह आविष्कृत होतो. वास्तविक ही संवेदना मराठी साहित्याच्या प्रभावातून कन्नड साहित्यात प्रविष्ठ झाली. मात्र कन्नड साहित्यातील प्रगतीशील साहित्य धारेच्या अस्तित्वाने दलित साहित्यासह समाजातील शोषणाच्या विविध मिती सामर्थ्याने रेखाटत बंडाय साहित्य हा महत्वपूर्ण टप्पा तिथे प्रस्तुत झालेला दिसतो. नव्या काळाप्रमाणे प्रत्येक व्यक्ती प्रतिष्ठित आहे हे अधोरेखित करत नवा दृष्टीकोन समाजमानसात प्रविष्ठ करण्याचा प्रयत्न करणारे विविध प्रवाहातील साहित्य कन्नडमध्ये निर्माण झाले. आणि समाजाच्या सर्व थरातून विद्रोह प्रकटवत हे साहित्य आंबेडकरी साहित्य ही संज्ञा जे अपेक्षते तेच चित्र प्रस्तुत करत आहे. मराठीमध्ये असा प्रगतीशील साहित्य हा टप्पा दाखवावा तर कोणत्या लेखकांकडे वळता येईल? भारतीय घटनेचे प्रतिबिंब पाहता येईल असे बसवराज कट्टीमनी यांचे साहित्य जी सामाजिकतेची कल्पना विचारात घेते तशी मराठीत भालचंद्र नेमाडे यांची लेखणी विचारात घेते. पण नेमाडे यांचे वाङ्मयीन गुण त्यापेक्षाही खूप सखोल आणि उंची गाठणारे आहेत. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत झोकून देणाऱ्या हिंदू धर्म जोपासणाऱ्या गावातील उतरंडी व मुसलमान व्यक्तीचे देशप्रेम कट्टीमनी एकत्र गुंफून दाखवतात.

८०० वर्षांपूर्वी बसवेश्वरांनी क्रांती केली. स्थावर आणि जंगम ह्या संज्ञा त्यातून मिळतात. स्थावर म्हणजेच स्थिर संपत्ती. देवळे ही कोणाचीतरी संपत्तीच असतात. बसवेश्वर यांचा त्याच्याशी संघर्ष निर्माण होतो... स्थावर आणि जंगम ही परस्पर विरोधी रूपे इतक्या ठसठशीतपणे अधोरेखित करणारे पहिले बसवेश्वरच. स्थावरक्के अळीउंटू, जंगमक्के अळीविल्ला साचलेली स्थिर संपत्ती नाश पावते, पण चलिताला निरंतरत्व असते. देव, देऊळ ही पुरोहितशाहीची कल्पना. (संस्कृती, कला, समाजाला एकत्रित येण्याची संधी म्हणजेही देऊळ!) पण ही देऊळसंस्कृती नको, त्याऐवजी जंगम जो चलनशील असतो, अविनाशी असतो त्याचा जीवनक्रम स्वीकारावा हा त्यांनी

आग्रह केला. ब्रिटीश काळात अग्रेसर झालेल्या, मंदिरापासून खालच्या वर्गाला दूर ठेवण्याच्या प्रथेमागे त्यांचे दारिद्र्य कारणीभूत होते. मुळात देव नाकारायचा हा विचार गौण होता. मंदिरातील संपत्तीची अटकळ मोठी होती. मंदिराकडून घडणाऱ्या यज्ञ यागाच्या प्रथा अर्थातच उत्पन्नाचे साधन होत्या. तीही समाजाची लूटच होती. बसवेश्वर, राजाचे कोषाध्यक्ष म्हणून सेवा बजावत होते, राजघराण्याची आर्थिक घसरण, समाजावर त्यांचा असलेला बोजा हे सर्व पाहात होते. लोक राजाकडे अपेक्षेने पाहत आणि राजा लुटीवर अवलंबून. अर्थ व्यवहार, वैदिकांचा धर्म व्यवहार नीट ध्यानी आलेल्या बसवेश्वरांनी वीरशैव धर्म लोकांपुढे ठेवला. ज्याच्यावाटे तळातील लोकांची यज्ञयागयुक्त मंदिर संस्कृतीपासून सुटका होऊ शकली.

ज्यांच्याकडे अजिबात संपत्ती नाही त्यांना देवळात प्रवेश नव्हता. अर्थकारणाचे राजकारण केले गेले त्यातून धर्मकारण निर्माण झाले. अर्थव्यवहारासाठी देवांचा कोप, पाप कल्पना अस्तित्वात आल्या. सत्ताधीशांच्या हेतूबद्ध organized चळवळी होती, त्यामधून पुढे दलितांना स्थानमान नाकारले गेले. शिक्षणसुद्धा गुरूकुल स्वरूपात होते. पण ती संकुचित होऊन बसलेली पद्धत परकीय सत्तांमुळे हळूहळू बंद झाली. वास्तविक वेदकालीन शिक्षणाचा आणि अर्थकारण यांचा संबंध नव्हता. पण शिक्षण अर्थव्यवहाराशी जोडले गेले ते ब्रिटीश काळात. तिथूनच अर्थप्राप्ती हे आधुनिक शिक्षण पद्धतीचे लक्ष्य बनले. धर्म शिक्षणाच्या मुळाशीही (ब्रिटीशांनी जास्त) अर्थकारण आणले. अर्थव्यवहाराचे केंद्र जेव्हा देवळाकडे जाते तेव्हा त्याचे धर्मकारण होते. ते जेव्हा सामान्य माणसाकडे येते तेव्हा ते समाजमुखा हात तिथे समाजकारण होते. बसवेश्वर अर्थकेंद्र श्रमप्रतिष्ठा निर्माण करून धर्म समाजमुखी करू पाहत होते. पण आताच्या काळात या दोन्हीमध्ये अंतर वाढल्यामुळे शोषणाचा मार्ग मोठा झाला. राजकारण्यांनी धर्म हाताशी घेतला, समाजही हातात घेतला, आणि लुटीचे प्रमाण पुन्हा मर्यादा ओलांडते. हे आजच्या लोकशाहीचे चित्र कोणकोणत्या साहित्यकृतीत चित्रित होते ? राजन गवस यांची 'ब बळीचा' ही कादंबरी आठवतेच.

आजची आंबेडकरांची secular समाजाची रचना त्या काळात बसवेश्वर चिंतत होते. ब्रिटीशांच्या देशात मॅग्नाकार्टा येईल पण आपल्या समाजात आणि त्यांच्यात खूप फरक पडतो. इथे सरकार हे दात्याच्या जागी आले. संपत्तीची वाटणी जेव्हा आली तेव्हा इथे भ्रष्टाचार शिरला. लोकशाहीमध्ये कोणालाही निवडून जाता येते. राज्य चालविण्याचा अधिकार त्याच्याकडे आल्यावर त्याचे चारित्र्य कसे असावे याचाही आंबेडकर विचार करतात. चाणक्याची राजाची लक्षणे आपल्याकडे होतीच. बखर वाङ्मय तर होतेच. आंबेडकर सर्व प्राचीन ग्रंथांचा सखोल अभ्यास करतात. इग्लंडला

घटना नाही पण भारत तसा प्रबुद्ध नाही. त्यामुळे हा देश चालविण्यासाठी राज्यघटना आवश्यक झाली. न्यायव्यवस्था आवश्यक झाली. इथे एकमत होणे शक्य नाही हे वास्तव जाणून त्यांनी एक व्यवस्थापन पद्धती दिली. त्यांना न्यायप्रक्रियेत समता मुख्य प्रस्थापित करायची होती. सर्व जगातील राज्यघटनांचा त्यांनी अभ्यास केला. भारतीय समाजाचा अभ्यास केला, त्यातून इथे सुप्रीम ही पातळी आणण्याची आवश्यकता मोठी वाटली. पण तिथे अपील करून रिविजन पिटीशनची संधीही ठेवली गेली. सुप्रीम पॉवरला पुन्हा विचार करा अशी विनंती करता येईल ही सोयही ठेवली. आंबेडकर स्वतः भारतीय समाजातील तळागाळातून आल्यामुळे इतकी सूक्ष्मता राज व्यवस्थापनात प्रविष्ट होऊ शकली.

या सर्व गोष्टी विचारात घेतो तेव्हा चारित्र्य निर्माणाचा विचार ? समाजाला प्रशिक्षण? आजची सद्य परिस्थिती कुठे निघाली? हे प्रश्न डोके वर काढतात. कन्नड बसवेश्वर साहित्याला वचन म्हणतात. वचन देणे म्हणजे शब्द देणे. या प्रकारचे लेखकाचे चारित्र्य आपण प्राप्त केले तर जे साहित्यात ते समाजात आणि जे समाजात ते साहित्यात ही संघटना काही चांगली शाश्वती निर्माण करते. ही अपेक्षित प्रवृत्ती आणि समाजाचे वास्तव या लंबकावर भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्या उभ्या दिसतील. समाज प्रबुद्ध करण्यासाठी आवश्यक त्या तयारीचे नमन इथे आढळते. विलक्षण असा समाज बोध येथे चित्रित होतो. जातीपातीच्या पलीकडे जाऊन केवळ माणूसपण ओंजळीत घेतल्यावर निर्माण होणारे भावनांचे उत्कट सौंदर्य येथे आविष्कृत होते. व्यक्तीचे केवळ असणे हेच 'हयाती राहो' हे नेमाडे यांच्या आजीचे आशीर्वचन थेट आंबेडकरांच्या व्यक्ती प्रतिष्ठेच्या अस्तित्वाचा विचार निदर्शित करते. राजन गवस यांच्या कथा व कादंबऱ्या मानवी जीवनातील जाचक सामाजिक, सांस्कृतिक रूढी चिमटीत पकडतात. नव्या बदलांच्या पार्श्वभूमीवर चारित्र्य निर्माणाचे संकेत प्रस्तुत करतात. माणसा माणसातील परस्परातील आपुलकी किती महत्वाची असते हे मूल्य आज आपण कोणीही नाकारत नाही. व्यक्तीची पत, श्रीमंती पाहूनच तिला मानपान ही पारंपरिक चाल आता कालबाह्य झाली पाहिजे. व्यंकटेश माडगुळकर यांची चित्रित माणसे आठवताच आपण भाव संपन्न होऊ लागतो. खूप आस्थेने तळागाळात खितपत पडलेल्या साध्यासाध्या वाटणाऱ्या माणसांचे त्यांनी टिपलेले निर्मळ सौंदर्य कोणत्याही माणसाच्या हृदयाला स्पर्श करते. आंबेडकरांच्या स्वप्नाला अशा साहित्यकृती हातभार लावत सहाय्यक होतात, हे निश्चित.

मराठी लेखकांमध्ये आधुनिक, न्यायवादी विचारसरणीने प्रेरित असे अनेक लेखक दृष्टीसमोर येतील. त्यामध्ये विशिष्ट समाजाची व्यथा चिमटीत पकडून तिला

सर्वांच्या आस्थेचा विषय बनविण्याचे कौशल्य दाखविणाऱ्या लेखकांचा उल्लेख महत्वपूर्ण होईल. बाबुराव बागुल, प्र. ई. सोनकांबळे, हमीद दलवाई, नामदेव ढसाळ, लोकनाथ यशवंत, प्रज्ञा पवार इ. लेखक या संदर्भातून विचारात घ्यावे लागतील.

बागुलांनी माणूसपण महत्वाचे मानले. ते माणसाची कथा लिहितात. पण त्यामध्ये बंडखोरी ठासून भरलेली असते. त्यातून दलित साहित्याचे क्रांतिविज्ञान ते मांडू शकले. प्र. इ. सोनकांबळे यांनी 'आठवणींचे पक्षी' मधून अत्यंत समजदारीने बोलीचा वापर केला. त्यातून बहुआयामी असे जे दलित दुःख त्यांनी चित्रित केले ते उत्कटपणे माणुसकीची हाक देते. लेखकाच्या केंद्रभागी आजवर जे नागरिकत्व आले नव्हते ते हमीद दलवाई यांच्या 'इंधन' मध्ये केंद्रस्थानी दिसते, त्यामुळे त्यांनी सत्यशोधक मुस्लीम धर्म स्थापन केला. (बसवेश्वर यांचे एकातून दुसरा धर्म निर्माण करणे याची आठवण येथे होते.) नास्तिक मुसलमानानाही मुस्लीम धर्मात जागा असणे हा नवा विचार त्यांनी दिला. लोकनाथ यशवंत हे लोकशाही केंद्रीभूत मानून लिहिणारे आजचे वैशिष्ट्यपूर्ण कवी होत.

आंबेडकर श्रमप्रतिष्ठा आणि व्यक्ती प्रतिष्ठा ह्या दोन गोष्टी निर्माण करण्यासाठी धडपडले. त्यामुळे त्यांना पीडित लोक मोठ्या प्रमाणात अनुयायी म्हणून येऊन मिळाले. बसवेश्वर यांनासुद्धा समाजातील पीडित लोकच मोठ्या प्रमाणात येऊन मिळाले.

समानता निर्माण झाली पाहिजे ह्या केंद्रावरून आंबेडकर घटना आकारतात. बसवेश्वर सुद्धा असाच विचार करतात. प्रस्थापितांचे समाजावरील जोखड दूर करणे हेच दोन्हीकडे लक्ष्य होते. ह्या लक्ष्याचे प्राचीनतम बीज कन्नड भाषासंस्कृतीतून आलेले बसवेश्वर मध्ययुगीन काळात पुनुरुज्जीवीत करतात आणि तेच बीज आधुनिक काळात मराठी भाषासंस्कृतीतून आलेले डॉ. आंबेडकर घटनेच्या रूपात प्रज्ज्वलित करतात. पण आज त्यांचे नाव घेतले की ते जातीवाचक होऊन बसतेय! जी माणसे आपल्या जातीपलीकडे पोहचून अमर्याद आकाश स्पर्शून गेली त्यांना आज आपण जातींच्याच पिंजऱ्यात कैद होताना फक्त पाहतोय! वास्तविक आजच्या साहित्यापुढे ही वस्तुस्थिती नेमकी उकलून घेणे हे एक प्रकारे आव्हानच आहे. माडगूळकरांच्या लेखणीतून उमटलेला देवा सटवा महार आठवून पहावा. त्यामधून माणूस आणि पारंपरिक जातवास्तव यांचा भीषण संबंध भारतीय समाजात कसा अस्तित्वात येतो त्याची अचूक कल्पना येईल. वारी मधील अर्जुनाप्रमाणे स्वतःला थिटे समजणे, आपला विटाळ वाटून घेणे यापेक्षा आणखी दुसरे दुःख शोधून सापडणार नाही. ही भारतीय मानसिकता परस्परातील संबंधांतून आकारली आहे.

सत्ता सामान्य माणसाच्या हातात आल्यावर आंबेडकर सामाजिक न्यायप्रक्रियेत अभिव्यक्ती प्रक्रियासुद्धा सामाजिक असायला हवी ही जी संकल्पना देतात ते फार महत्वाचे वाटते. राम बापट यांच्या public या संकल्पनेची येथे आठवण करता याचा अर्थ अधिक स्पष्ट होईल. समाजात वावरताना आपले वैयक्तिक लागेबांधे एखाद्याला दुखावणारे असतील तर ते निषिद्ध पातळीवर आले. आंबेडकरी भूमिकेमुळे ह्या काळात प्रत्येकजण स्वतंत्र राजा बनतो. त्यामुळे प्रत्येकाची जबाबदारीही अर्थातच वाढते. स्वतंत्र राजांनी बनणाऱ्या समाजाने प्रत्येकाला सुरक्षा दिली पाहिजे. हे पूर्वी नव्हते. ह्या दृष्टीतून आंबेडकरांचा दृष्टीकोन खूप व्यापक आहे. बसवेश्वरांपेक्षा ते इथे पुढे जातात. बसवेश्वर हातात पुन्हा देव ठेवतात. धर्म राखतात. पण आंबेडकर माणूस केंद्र मानतात. पण कन्नड साहित्यात सामाजिक जीवनप्रक्रिया बदलली वचन साहित्यामुळे. फार मोठे नवे वळण साहित्यात निर्माण झाले. पण 'भक्ती'पासून ते ढळले नाही. मात्र ही डोळस भक्ती अपेक्षित होती हेही विसरता येत नाही. (भक्ती म्हणजे देव आहे की नाही, तो कसा आहे याचा अविरत शोध.) आपला शब्द म्हणजेच साहित्य. हा आपला शब्द द्यायचाय तो समाजाला. बसवेश्वर साहित्याला असा अर्थ देतात.

याच सर्व कल्पना राज्यघटनेत मूर्तरूपात आल्या. आंबेडकरांमुळे माणसाला त्याने केवळ जन्म घेतला म्हणून तेवढ्या कारणानेही त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे ही दृष्टी लाभली. धर्म काही असूदे पण तुमची पहिली निष्ठा देशाला असली पाहिजे हे तत्त्व आंबेडकर देतात. बसवेश्वर देव संकल्पनेची नवी रूपे देतात. नवा देव हातात देतात. आपले श्रम हाच देव ही कल्पना त्यावाटे पुढे आली. श्रम करतो तो मालक ह्या तत्वावर शिवराम कारंथ यांनी 'बेट्टद जीव' ही कादंबरी बेतली. सर्व माणसे आपलीच असतात, आपला आणि दुसरा हा भेदभाव उपटण्याची प्रेरणाही शिवराम कारंथ यांनी दिली. स्वतःच्या पोटच्या मुलाची शहराकडे ओढ पाहून आपल्या मळयावर जीवापाड प्रेम असलेला हा कादंबरीतील गृहस्थ मळयावर आपल्याप्रमाणेच जीव टाकत असलेल्या आपल्या चाकराच्या नावे मळा लिहून देतो. भारतीय स्वातंत्र्य म्हणूनच असे महनीय आहे. भूमिनिष्ठ, देशनिष्ठ, माणूसनिष्ठ असे हे वर्तन नवा व्यापक समाजशील आंबेडकरी विचार आत्मसात करून आहे.

आंबेडकरांच्या काळात बंद असलेल्या देवळांची ओढ वाढली. सवर्णांना आहे तर आम्हाला का नको ही इच्छा त्यामागे होती. एकदा आत गेल्यावर तिथली कलाकुसर पाहायला मिळाली हे समानतेतून समाधान लाभले. राजेशाही मागे पडल्यावर मंदिरे सार्वजनिक ठिकाणे झाली. त्यामुळे समानतेच्या पातळीवरून तिथे

सर्वांचा संबंध पोहचला. आंबेडकरांची समानता इथे कार्यरत झाली. पण बसवेश्वरांचा विचार यापेक्षाही खोलवर गेला होता. त्यांनी भक्तीभावनेचे बोट घट्ट धरले. भक्ती याचा अर्थ सातत्यशील शोध. देवळातच देव आहे हे कोण म्हणतो? देव आपल्या स्वतःच्या तळहातावर देतात बसवेश्वर. हा देऊळ खुले करण्याचा कालखंड संवेदनशील होता. कायदे करून सुधारणा नाही पूर्णत्वाला येत. त्यासाठी समाजमन तयार झाले पाहिजे. म्हणूनच व्यंकटेश माडगूळकर यांनी रेखाटलेला वारीमधील अर्जुन यासाठी खूप महत्वाचे जागरण निर्माण करतो.

आंबेडकर यांच्या प्रेरणेतून कन्नड मधील उमटलेला आक्रोशपूर्ण, तीव्र असा जातीय शोषणाविरुद्ध, प्रस्थापितांविरुद्ध अस्तित्वात आलेला आवाज बसवेश्वर यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भक्ती परंपरेशी जोडून घेतो. पारंपरिकपणे चालत आलेल्या प्राचीन भक्तीपरंपरेला प्रगाढ बुद्धीमानतेने, सामर्थ्याने शोषित घटकाच्या संदर्भातून बदलून घेणारे बसवेश्वर कन्नड साहित्य संस्कृतीच्या केंद्रवर्ती असल्यामुळे, या पर्यावरणातून वाटचाल करत असल्यामुळे दलित विद्रोहाचा सुरुवातीचा आक्रोश, आपल्यातील आक्रस्ताळेपणा मागे टाकतो आणि त्या ठिकाणी समन्वयाचा आवाज होत बंडाय साहित्याचा भाग होऊन पुढे कालक्रमण करू लागतो.

सेक्युलर म्हणजे समाजाकडे लक्ष देणे. प्रत्येक व्यक्ती देशासाठी किती महत्वाची त्याकडे लक्ष देणे. व्यक्तीची प्रतिष्ठा आली की प्रत्येक माणूस सुधारतोच. प्रतिष्ठा माणसाला मिळते ती त्याच्या देशाकडून. प्रतिष्ठा मिळते ती घटनेकडून. मला मान्यता मिळते ती घटनेकडून. तुमची घटना तुम्हाला प्रतिष्ठा देते. तुम्ही कोण व काय आहात ते न पाहताही प्रतिष्ठा मिळणे हे पूर्णतः नवीन पाऊल होय. भारतात जन्मलेला प्रत्येक भारतीय हा प्रतिष्ठित आहे. त्याला मान दिला पाहिजे. हे आंबेडकरी तत्त्व. एवढे मिळाल्यावर तुम्ही देशाला काय देता? तुमची जबाबदारी कोणती? हा विचार पुढे सुरु होतोच. तुम्ही जेव्हा एका देशप्रणित प्रतिष्ठेचे भोक्ते असता तेव्हा तुम्ही कसे दिसाल? लेखक ह्या भूमिका तपासू लागतो तेव्हा साहित्य कसे होईल? प्रत्येक व्यक्तीला सर्व सत्ता आहेत. अधिकार आहेत. तिला आविष्कार स्वातंत्र्य आहे. व्यक्तिरेखा कशा बोलत आहेत? आपला आवाज बोलत आहेत की तो दबलेला आहे. त्याच्या जबाबदाऱ्या तो किती समजून घेतोय? माणूस तडफडतोय तर ते कोणामुळे? या साऱ्यातून सुटका मिळावी म्हणून घटना मदतीला आहे की नाही? की काही ठिकाणी दुरुस्त झाली पाहिजे? परंपरेतील कोणते दोष आंबेडकरांनी दाखवले? एक अस्सल भारतीय प्रज्ञावंत कसा असतो त्याचे उदाहरण तर ते आहेतच. त्यांनी हक्क आणि कर्तव्ये दोन्ही समोर ठेवलेली आहेत. पण वास्तव दोषपूर्ण का दिसतेय? हे प्रश्न

लिहिणाऱ्यांपुढे असतील तर माणसांच्या प्रवृत्ती केंद्रवर्ती येतील. त्यांची डोळस सर्वांगीण चिकित्सा सुरु होईल. कायद्याचेही स्वार्थाकरिता होणारे विकृत उपयोजन वेळीच बंद होऊ शकेल. भारतीय स्त्री व पुरुष यांच्यातील क्षमता सकारात्मकदृष्ट्या वाढाव्यात अशी कथानके साहित्यातून येतील तर त्यास आपण आंबेडकरी साहित्य म्हणणारच.

बुद्ध महावीर हे राजकुमार होते. गांधीजीसुद्धा सधन घराण्यातून आले. त्या सर्वांना समाज प्रतिष्ठा होती. पण यापैकी काहीही आंबेडकरांकडे नाही. पण म्हणूनच या सर्वांपेक्षाही आंबेडकर यांचे योगदान फार मोठे बनते. देशाचे ऋण कसे फेडावे हे सामान्य व्यक्तीला कळत नाही. पण ते आंबेडकर निर्देशित करतात. ऋण फेडा ही संकल्पना देऊन व्यक्तीची पत उंच बनविण्याची कार्यप्रणाली त्यांनी प्रस्तुत केली. अर्थातच कायकवे कैलास या बसवेश्वर-तत्वाची इथे आठवण होते. कर्म चांडाळापेक्षा जाती चांडाळ चांग म्हणणाऱ्या चक्रधराची, रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग म्हणणाऱ्या तुकोबाची, डोईचा पदर आला खांद्यावरी भरल्या बाजारी जाईन मी म्हणणाऱ्या जनाईची आठवण होते. स्वार्थांध राजेशाहीत पिचलेल्या समाज प्रतिष्ठा नाकारण्यात आलेल्या माणसांमध्ये आपल्या क्रांतिकारक पावलांमुळे, जोखडातून मुक्त करणारे आपल्या समाजातून बाहेर येऊन व्यापक मानवी कुळाशी आपली नाळ जोडून घेणारे बाराव्या शतकातील संत बसवेश्वर व इतर सर्व बंडखोर संताच्या आणि विसाव्या शतकातील आंबेडकर यांच्या भूमिका या एकमेकाला पूरक भूमिका होत. भारतीय जातीय पर्यावरणात सामाजिक शोषणात अडकलेल्या व्यक्तीचे प्रश्न सोडविणे हे महत्वपूर्ण पाऊल आंबेडकरी विचारधारेचा प्राण म्हणता येईल.

❑